सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १२४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ७ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## महाराष्ट्रात विधानसभेची 'मॅच' कुणी 'फिक्स' केली?; राहुल गांधींचा आरोप, मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

महाराष्ट्रात झालेल्या निवडणुकीच्या प्रक्रियेविषयी मी ३ फेब्रुवारीला संसदेत दिलेल्या भाषणात आणि त्यानंतर पत्रकार परिषदेत चिंता व्यक्त केली होती. देशात झालेल्या निवडणुकांविषयी मी त्याआधीही संशय घेतलेला आहे. प्रत्येक निवडणुकीत प्रत्येक ठिकाणी गडबडी होतात असे मी म्हणत नाही; परंतु जे घडले आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. मी छोट्या-मोठ्या गोंधळाबद्दल बोलत नाही, तर आपल्या राष्ट्रीय स्तरावरील संस्थांवर ताबा मिळवून केल्या जाणाऱ्या गैरप्रकारांबद्दल बोलत आहे. पूर्वी निवडणुकांमध्ये काही विचित्र गोष्टी होत असत; परंतु २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक पूर्णपणे विचित्र आणि अनाकलनीय होती. या निवडणुकीत इतके गैरप्रकार झाले की, सर्व काही लपवण्याचे आटोकाट प्रयत्न करूनही काही गैरप्रकारांचे पुरावे समोर आलेच. अनधिकृत माहिती बाजूला ठेवली तरीही केवळ अधिकृत अशा आकडेवारीवरूनही सगळा खेळ समोर येतो. 'मॅच फिक्सिंग' झालेली निवडणूक लोकशाहीसाठी विषसमान आहे. महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीतल्या गोंधळ-गडबडीचे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ पुरावे दोन आरोपींकडे बोट दाखवतात : निवडणूक आयोग



आणि भाजप!, असे काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

राहुल गांधी काही वृत्तपत्रांमध्ये प्रदीर्घ लेख लिहीत महाराष्ट्रातील निवडणूक प्रक्रियेवरच बोट ठेवले. यानंतर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया उमटत असून, राहुल गांधी यांच्या दावे, आरोपांवर भाजपा नेते प्रत्युत्तर देताना काँग्रेसवर पलटवार करत आहेत. पत्रकारांशी संवाद साधत असलेल्या देवेंद्र फडणवीस यांना राहुल गांधी यांच्या या लेखाबाबत प्रतिक्रिया विचारण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत भाष्य करताना राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे.

**राहुल गांधींच्या आक्षेपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?**

जोपर्यंत राहुल गांधी सत्य स्वीकारणार नाहीत, जोपर्यंत ते जागे होऊन जमिनीवर काम करणार नाहीत, तोपर्यंत त्यांच्या पक्षाला कुठलेही भवितव्य उरलेले नाही. मला वाटते की, स्वतःशी खोटे बोलून, स्वतःला दिलासा देण्याचे काम राहुल गांधी करत आहेत. महाराष्ट्राच्या जनतेचा, आमच्या लाडक्या बहिणींचा अपमान राहुल गांधी करत आहेत. त्यांनी जागे झाले पाहिजे, असा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

दरम्यान, रोज खोटे बोलले की लोकांना ते खरे वाटते, असे राहुल गांधींना वाटत आहे. त्यामुळेच त्याच त्या गोष्टी राहुल गांधी सातत्याने बोलतात. हा आरोप यापूर्वी त्यांनी केला होता. निवडणूक आयोगाने यापूर्वीच्या निवडणुकांत किती मतदार वाढले होते, या निवडणूकीत किती वाढले हे सगळे सप्रमाण दिले. पण रोज खोटे बोलायचे ही सवय राहुल गांधी यांना लागली आहे. कारण ते स्वतःच्या मनाला समजावत आहेत, या शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या आक्षेपांवर प्रत्युत्तर दिले.

## 'मातोश्रीला चाललोय...' राज ठाकरेंची पत्रकारांना गुगली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या युतीबाबत गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. अलिकडेच उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषदेत एक सूचक विधान केलं, 'मी तुम्हाला बातमीच देणार आहे', असं म्हटलं होतं. त्यामुळे 'ठाकरे विरुद्ध ठाकरे' हे चित्र 'ठाकरे सोबत ठाकरे' कधी होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



दरम्यान, राज ठाकरे यांनी या पार्श्वभूमीवर पत्रकारांशी संवाद साधताना एक भन्नाट गुगली टाकली. बाहेर पडताना त्यांनी पत्रकारांना जवळ बोलावलं. पत्रकारांनी विचारलं, कुठे दौऱ्यावर चाललात? यावर त्यांनी मिश्कील हसत उत्तर दिलं, मातोश्रीवर चाललोय! त्यांच्या या विधानाने उपस्थितांमध्ये एकच खळबळ उडाली. मात्र काही क्षणांतच राज ठाकरे यांच्या चेहऱ्यावरील स्मितहास्य पाहून पत्रकारांना लक्षात आलं की त्यांनी आपली फिरकी घेतली आहे.

## विकासाचे वारे! नक्षलवादी भागात गुरुकुल सुरू, जवानांनी घेतली १०० मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७बस्तर**

केंद्र आणि राज्य सरकारची रणनीती आणि जवानांच्या पराक्रममुळे बस्तरमधील नक्षलवादाचा खात्मा करण्यात यश येत आहे. बस्तर विभागातील दोन-तीन जिल्हे वगळता ७ जिल्ह्यांमध्ये आता नक्षलवाद सोडून शिक्षण, आरोग्य आणि विकासाची चर्चा आहे. जवानांनी १०० हून अधिक मुलांना शिक्षण देण्याची जबाबदारी घेतली आहे.




बस्तर शिक्षण क्षेत्रात वेगळ्या प्रकारचं पहिलं मॉडेल म्हणून उदयास येत आहे. येथे सीआरपीएफ नक्षलवादी भागातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्याचा प्रयत्न करत आहे. नक्षलवादी संघटनेच्या सीसी मेंबर नक्षलवादी हिडमाच्या पूवर्ती गावात सीआरपीएफने प्रथमच गुरुकुलची स्थापना केली. २००५ मध्ये या गावांपर्यंत पोहोचण्यासाठी कोणताही रस्ता नव्हता, त्यामुळे ही गावं मुख्य प्रवाहापासून तुटली. आता सुमारे १९ वर्षांनंतर २०२४ मध्ये अधिकारी या गावांमध्ये पोहोचू शकले.

एकेकाळी नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या पूवर्ती, टेकलगुडेम येथे शिक्षणामुळे वेगळं वातावरण निर्माण झालं आहे. सीआरपीएफने येथे गुरुकुल स्थापन केलं. यामुळे पूर्ववर्ती टेकलगुडेम येथील गुरुकुलमध्ये ८० हून अधिक मुलं सामील झाली आहेत, ज्यांना एका वर्षापासून शिक्षण दिलं जात आहे.

१०० किमी अंतरावर असलेल्या कुआकोंडाच्या पोटाकेबिनमध्ये राहून १० हून अधिक मुलं शिक्षण घेत आहेत. ही ती मुले आहेत, ज्यांच्या पालकांनी परिसरातील वातावरणामुळे मुलांना आश्रमाच्या वसतिगृहात ठेवलं आहे.

## आदित्य ठाकरे पावसाळ्यात जेलमध्ये जाऊ शकतात

### नितेश राणेंचं खळबळजनक विधान, राज-उद्धव ठाकरेंच्या युतीचीही खिल्ली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७तुळजापूर**

राज्याचे मंत्री आणि भाजप नेते नितेश राणे यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून देणारं विधान केलं आहे. उद्धव ठाकरे यांचा मुलगा पावसाळ्यात जेलची वारी करू शकतो, असं सांगून राणे यांनी आदित्य ठाकरेंच्या अटकेबाबतचे संकेत दिले आहेत. डिनो मोरिया प्रकरणावरून राणेंनी हा दावा केला आहे. ते तुळजापुरात बोलत होते.नितेश राणे यांनी डिनो मोरिया प्रकरणावरून ठाकरे कुटुंबाला लक्ष्य केलं



आहे. उद्धव ठाकरेंचा मुलगा पावसाळ्यात तुरुंगाची वारी करू शकतो. डिनो मोरिया प्रकरणावरून लक्ष्य हटवण्यासाठीच ठाकरेंच्या एकत्रिकरणाची चर्चा सुरू असल्याचंही राणे म्हणाले.

डिनो मोरिया प्रकरणात उद्धव ठाकरे यांचा मुलगा जेलची वारी करू शकतो अशी माहिती असल्याचा दावा राणेंनी केला. मोरिया हा कोणासोबत बसायचा? कोणासोबत भावनिक संबंध आहेत हे सगळ्यांना माहीत असल्याचेही ते म्हणाले.

### राज-उद्धव ठाकरे एकत्रिकरणाचीही खिल्ली

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोघे बंधू एकत्र येण्याची चर्चा सध्या सुरू आहे. भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी या मुद्द्यावरून खिल्ली उडवली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीआधी आम्ही खूप घाबरलो आहोत. आम्हाला घाम फुटला आहे. एकाचे २० आमदार, तर एकाचे शून्य आणि आमचे १३२ आहेत. त्यामुळे आम्ही खूप घाबरलोय, असं म्हणत राणेंनी ठाकरे बंधूंच्या एकत्रित येण्याच्या चर्चेची खिल्ली उडवली.

आम्हाला झोप लागत नाही, एकाकडे वीस आमदार आणि एकाकडे शून्य एवढी यांची शक्ती आहे. या शक्तीला आम्ही घाबरलो आहोत. आम्हाला घाम फुटला आहे, असे राणे म्हणाले. हिंदुत्व सोडल्यामुळेच ठाकरे ब्रँड बुडाल्याचा टोलाही नितेश राणेंनी लगावला.

## महाराष्ट्रानं नाकारलं, आता बिहारची जनताही बाहेरचा रस्ता दाखवेल - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नागपुर**

लोकसभेचे विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबाबत खळबळजनक आरोप केले. या निवडणुकीत महाराष्ट्रात मॅच फिक्सिंग झाले. आता बिहार आणि इतर राज्यांमध्येही असाच प्रकार घडणार, असे राहुल गांधी म्हणाले. यावर बोलताना महसूल मंत्री आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राहुल गांधींना टोला लगावला.

बावनकुळे म्हणाले की, राहुल गांधींनी निवडक आकडे वाचून देशाला गोंधळात टाकण्याचा प्रयत्न करणे थांबवावे. स्वतःचे अपयश लपवण्यासाठी इतरांना दोष देण्याऐवजी आत्मपरीक्षण करा. महाराष्ट्रातील लोकांनी तुम्हाला नाकारले. आता बिहारमधील जनताही तुम्हाला बाहेरचा रस्ता दाखवेल, या



भितीपोटी राहुल गांधी एकदम गडबडून गेले आहेत.

महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला बहुमताने निवडून दिले. जनतेने आमच्यावर दाखवलेला हा विश्वास आहे. पुढील निवडणुकीतही हा विश्वास अतूट राहील. वारंवार खोटे बोलून तुम्ही राज्यातील जनतेच्या जनादेशाचा अपमान करत आहात. जनता तुम्हाला कधीही माफ करणार नाही, असे बावनकुळे म्हणाले.

एप्रिल २००९ ला लोकसभा निवडणुकीत ७ कोटी २९ लाख ५४ हजार मतदार होते तर ऑक्टोबर २००९ ला विधानसभा निवडणुकीत ७ कोटी ५९ लाख ६८ हजार मतदार झाले. तेव्हाही फक्त ५ महिन्यांत ३० लाख मतदार वाढले होते, तेव्हा तुमचा निवडणूक आयोगावर विश्वास होता की तेव्हाही काँग्रेस-आयोग युतीच होती? तेव्हा तुम्ही घोटाळा केला होता का? असे प्रत्युत्तर राज्याचे महसूलमंत्री तथा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मतदार वाढीवर काँग्रेसतर्फे उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नावर आकड्यांनिशी प्रत्युत्तर दिले.

## हेलिकॉप्टरचे चक्क रस्त्यावर आपत्कालीन लँडिंग

### मागचा भाग कारवर आदळला अन् पंखे थेट दुकानात घुसले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७केदारनाथ**

तांत्रिक बिघाडामुळे उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग येथे रस्त्यावर हेलिकॉप्टरचे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. यादरम्यान, हेलिकॉप्टरचा मागील भाग कारवर पडला आणि तुटून बाजूला पडला. यामध्ये कारचेही पूर्णपणे नुकसान झाले. तर हेलिकॉप्टरच्या पंख्यामुळे महामार्गावर बांधलेल्या दुकानाचे शेडचे नुकसान झाले. यादरम्यान, दुकानात बसलेल्या लोकांनी पळून जाऊन आपले प्राण वाचवले.



हेलिकॉप्टरने बदासू हेलिपॅडवरून केदारनाथसाठी उड्डाण केले, ज्यामध्ये पायलटसह ६ प्रवासी होते. अपघातात पायलटला किरकोळ दुखापत झाली आहे. याशिवाय इतर प्रवासी सुरक्षित असल्याचे सांगण्यात आले आहे. यानंतर, पायलटला उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

जिल्हा पर्यटन विकास अधिकारी आणि हेली सर्व्हिस नोडल अधिकारी राहुल चौबे म्हणाले की, क्रिस्टल एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेडचे हेलिकॉप्टर दुपारी १ वाजता बारासू येथील तळावरून ५ प्रवाशांसह केदारनाथ धामसाठी उड्डाण करत होते. यादरम्यान, हेलिकॉप्टरमध्ये काही तांत्रिक बिघाड झाला. पायलटला वेळीच बिघाड जाणवला. त्यानंतर, पायलटने राष्ट्रीय महामार्गावर आपत्कालीन लँडिंग केले. हेलिकॉप्टरमधील पाचही प्रवासी सुरक्षित आहेत.

## पक्षात राहून विरोधात काम करणाराच खरा शत्रू, कार्यकर्ता मेळाव्यात आमदार भास्कर जाधव यांचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७चिपळूण**

चिपळूण मतदारसंघात ज्यावेळी राष्ट्रवादीचे पहिले आमदार निवडून आले, तेव्हा माझ्याविरोधात कोणी काम केले, हे समोर आहे. शिवसेनेतील लोकांनी तरी प्रभाकर शिंदे यांना जरी मतदान केले असते, तरी पक्षाचे डिपॉझीट वाचले असते. विरोधकांपेक्षा पक्षात राहून पक्षाच्या विरोधात काम करणारा हाच शत्रू असतो आणि तेच धोकादायक ठरत आहे, असे रोखठोक विधान उद्धवसेनेचे नेते आमदार भास्कर जाधव यांनी केले.

शहरातील बांदल सभागृहात उद्धवसेना कार्यकर्त्यांचा मेळावा झाला. यात अपेक्षेप्रमाणे आमदार भास्कर जाधव यांनी जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले की, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत संगमेश्वर तालुक्यातील कार्यकर्त्यांना उमेदवारी नको होती, पक्षाचा आमदार हवा होता. मात्र, चिपळूणमध्ये आपल्याविरोधात बैठका सुरू होत्या. आता कित्येक वर्षे वाट पाहावी लागणार आहे.



मेळाव्यात उपनेते बाळ माने, सहदेव बेटकर, जिल्हाप्रमुख बाळाराम खेडेकर, दत्ता कदम, जिल्हा संघटक संतोष थेराडे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा अरुणा आंबे, विभाग प्रमुख सचिन शेट्ये, बाळा कदम, तालुकाप्रमुख पप्या चव्हाण, युवासेनेचे विक्रांत जाधव, भय्या कदम उपस्थित होते.

आज पक्षाची स्थिती वाईट आहे. कोणी निघून गेला की काहीच फरक पडत नाही, हे वारंवार सांगितले जाते. मात्र, परिस्थिती तशी नाही. जाणारा कार्यकर्ता आपणच मोठा केलेला असतो. त्याचे कर्तृत्व पाहूनच त्याला पद दिलेले असते. त्यामुळे नेहमी फरक पडत नाही, असे म्हणण्यापेक्षा कोणी गेले तरी फरक पडू देणार नाही, असा निर्धार करून पुढे जाऊया आणि जुन्यांना घेऊन पूर्वीचे वैभव प्राप्त करूया, अशा शब्दांत आमदार जाधव यांनी कान टोचले.

## संपादकीय ......

# ऐक्य टिकवण्याची जबाबदारी

कुराण म्हणते, 'एका निष्पापाची हकनाक हत्या करणे म्हणजे सर्व मानव जातीची हत्या होय आणि एखाद्या निष्पापाचा जीव वाचवणे म्हणजे सार्या मानवजातीसच वाचविणे होय'(कुराण ५:३२); परंतु पहलगामध्ये दहशतवाद्यांनी अतिशय क्रूर व अमानुषपणे निष्पापांचा बळी घेतला. हा हल्ला म्हणजे धर्माच्या नावावर अधर्मी हिंसाचार होता. देशाच्या एकता, अखंडता आणि विशेषतः देश बांधवांच्या सामाजिक ऐक्य व सौहार्द यावर मोठा आघात होता. आज बकरी ईद आहे, त्यानिमित्ताने..!

आपला देश व देशबांधवात अराजक, अधर्म व यादवी पसरवण्याचा कुटिल व नापाकी डाव दहशतवाद्यांचा होता. यात बळी पडलेल्या निष्पापांच्या त्याग व बलिदानाला तर शब्दच नाहीत; परंतु याप्रसंगी संपूर्ण देशबांधवांनी ज्या धैर्याने, संयमाने आणि संवेदनशीलतेने तोंड दिले त्याला तोड नाही. या प्रसंगात आणि त्यानंतर भारताने दहशतवाद्यांचा खात्मा करण्यास राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान देशातील सर्वच समाज घटकांनी देशाप्रती दाखवलेल्या निष्ठा, प्रेम आणि समर्पण अभूतपूर्व व गौरवपूर्ण आहे. देश आणि देशबांधवाप्रती त्याग, सेवा, समर्पण व बलिदानाचा असाच एक वारसा प्रेषित हजरत इब्राहिम (अ.) यांच्या रूपाने आपल्यासमोर येतो. सुमारे साडेचार हजार वर्षांपूर्वी मानवता आणि मानव कल्याणासाठी त्यांनी सर्वस्व अर्पण केले. हा तेजस्वी तारा आजही तेजाने चमकतो आहे.मानवतेच्या प्रतिष्ठापनेसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव व सन्मान आजही आपण त्यांच्या स्मरणार्थ करत असलेल्या ईद-उल-अजहा अर्थात ईद-ए-कुर्बान किंवा बकरी ईद साजरी करून करत आहोत. त्यांच्या काळातील नमरुदच्या अन्याय, अत्याचारी, जुलमी व अमानुष राजवटी विरोधात त्यांनी जो जीवघेणा संघर्ष केला तो केवळ अद्भुत होय. अज्ञान, अंधकार, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि राजकीय गुलामीच्या बेड्यात सामान्य जनता इतकी जखडून गेली होती की, त्यांना स्वतःचे हित-अहितसुद्धा समजत नव्हते. मानवतेविरुद्धच्या या संघर्षात हजरत इब्राहिम (अ.) यांचे आप्तस्वकीय, नातेवाईक आणि स्वजनसुद्धा त्यांचे विरोधात उभे राहिले. जीवघेण्या संघर्षाला त्यांनी तोंड दिले. एकमेवाद्वितीय परमेश्वर व मानवतेसाठीचा हा संघर्ष अद्वितीय म्हणावा लागेल. त्यांच्या परमेश्वराची सत्य, न्याय आणि नैतिकता ही मूलतत्त्वे आणि मानवता हा मुलाधार होता.

लोकांचे हित आणि समाजकल्याण याबरोबरच सामाजिक ऐक्य, समता, बंधुता व शांततापूर्ण सहजीवन हाच धर्माचरणाचा पाया होता. हजरत इब्राहिम (अ.) हे खर्याअर्थाने मानवतेच्या संस्कृतीचा पाया घालणारे मूळ पुरुष होते. त्यांनी आपली दोन्ही मुले हजरत इस्माईल (अ.) व हजरत इसाक (अ.) यांना मानवतेच्या मार्गात समर्पित केले. एकेश्वर व मानवतेसाठी केलेल्या अपूर्व व अद्वितीय कार्यासाठी हजरत इब्राहिम (अ.) व त्यांच्या दोन्ही मुलांना प्रेषित्व प्राप्त झाले. इस्लामच्या या मानवतावादी प्रतिष्ठापनेच्या चळवळीमध्ये आजपर्यंत अनेक प्रेषित, संत, महात्मे व महापुरुषांनी आपले जीवन अर्पण केले आहे. या सर्वांचा जीवनसंघर्ष म्हणजे आपल्यासमोर मानवतेप्रति त्याग, सेवा, समर्पण व बलिदानाचे आदर्श व उदाहरण आहे. या सर्वांचे स्मरण व्हावे, त्यातून स्फूर्ती व प्रेरणा घ्यावी आणि देश, समाज व देश बांधवांच्या कल्याणासाठी आपले सर्वस्वी जीवन झोकून द्यावे हेच आजच्या ईदचे औचित्य व महिमा होय. सध्या समाजात सर्वत्र अविश्वासाचे आणि अशांततेचे वातावरण पसरले आहे.सामाजिक शांतता धोक्यात आली आहे. एकमेकांकडे द्वेषपूर्ण भावनेने पाहिले जात आहे; पण यातून काहीच साध्य होत नाही. माणसाच्या नशिबी केवळ दुःखच येत आहे. हे सर्व टाळायचे असेल, तर समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे गुण्यागोविंदाने राहण्याची गरज आहे. त्यासाठी आता सर्वांनीच एकत्र येऊन सामाजिक ऐक्य टिकवण्याची गरज आहे.

# अकोला कृषी विद्यापीठाचा सोयाबीनचा हा वाण अल्पावधीतच लोकप्रिय

## देतोय सर्वाधिक उत्पादन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अकोला-** डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने विकसित केलेला हा सोयाबीनचा वाण नवीन असून सुद्धा ही वाण अल्पावधीतच शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय होत आहे.

पिक अवर्षण काळात किंवा जास्त पर्जन्यमान असुन सुद्धा ह्या वाणांनी चांगले उत्पादन देवून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधरविण्यास एकाप्रकारे मदतच केली आहे.

पिडीकेव्ही अंबा (एएमएस १००-३९) वाणाची वैशिष्ट्ये

लवकर परिपक्व होतो.

जास्त उत्पादन क्षमता.

तीन दाण्यांच्या शेंगांचे प्रमाण व दाण्यांचे वजन जास्त.




या वाणात तेल व प्रथिनांचे प्रमाण सुध्दा इतर वाणांपेक्षा जास्त आहे. सदर वाण हा बदलत्या हवामानात तग धरणारा वाण आहे. शेतकऱ्यांच्या शेतावर प्रथम रेषीय प्रात्याक्षिका मध्ये सदर वाणाने प्रचलित वाणांपेक्षा २७% जास्त उत्पादकता नोंदविली आहे.

राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात व उत्तर प्रदेश या राज्यांकरीता प्रसारीत.

प्रसारण वर्ष: २०२१, अधिसूचना वर्ष २०२१.

जास्त उत्पादन क्षमता (सरासरी उत्पादकता: २८-३० क्विं./हे)

लवकर परिपक्व होणारे वाण (९४-९६ दिवस)

मुळकुज/खोडकुज या रोगास व चक्रभुंगा आणि खोडमाशी या किडीस मध्यम प्रतिकारक.

प्रचलित वाणांपेक्षा तेलाचे व प्रथिणाचे प्रमाण तुलनात्मक दृष्ट्या जास्त. परीपक्तेनंतर १०-१२ दिवसापर्यंत शेंगा फुटण्यास प्रतिकारक.सदर सोयाबीनचे वाण नवीन असून सुद्धा अल्पावधीतच शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय होत आहे.

# शिळे अन्न खाल्ल्याने तीन गायींचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७दर्यापूर (खल्लार)-** दर्यापूर येथील भातकुली मार्गावर असलेल्या मेहेर कृपा रिसोर्ट परिसरात फेकून दिलेले शिळे अन्न खाल्ल्याने थिलोरी येथील तीन गाईंचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि.६) घडली.

मेहेर कृपा रिसॉर्ट येथे लग्न समारंभ तसेच अनेक कार्यक्रम होतात. त्यामुळे शिल्लक अन्न हे नेहमीच कुठलाही विचार न करता उघड्यावर टाकले जाते. रिसॉर्टच्या याच हलगर्जीपणामुळे गायींचा मृत्यू झाल्याचा आरोप होत आहे.

थिलोरी येथील शेतकरी अमित होले व निलेश सुधाकर राऊत यांच्या तीन गायी चराईकरिता गेल्या होत्या. मेहेर रिसोर्ट येथे शिळे अन्न खाल्ल्यामुळे त्यांना विषबाधा झाली. त्यात निलेश राऊत यांच्या दोन तर अमित होले यांच्या एका गाईचा मृत्यू झाला. यापूर्वीसुध्दा अमित होले यांच्या एका गाईचा शिळे अन्न खाल्यामुळे मृत्यू झाला होता. त्यावेळी त्यांनी नगरपरिषदेकडे तक्रार दिली होती. परंतु प्रशासनाने कुठलीही कारवाई केलेली नाही.

त्यामुळे नागरिकांनी गुरेढोरे मोकाट सोडावे की नाही हा प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधितांनी सदरची तक्रार पोलीस स्टेशन येथे दिली आहे.




## पोट टम्म फुगतं, छातीही दुखायला लागते, श्वास घेणं अवघड? पाहा जेवल्यानंतर 'असा' त्रास होण्याची कारण

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

अनेक शारीरिक त्रास आहेत जे फार कॉमन असतात. सगळ्यांनाच कधी ना कधी उद्भवतात. ताप सर्दी खोकला तसेच इतर काही संसर्गजन्य आजार प्रत्येकाला होत असतात. काहींना पित्ताचा त्रास असतो तर काहींना अपचनाचा. असेही अनेक त्रास आहेत. पोटाचे विकार सगळ्यांनाच उद्भवतात. अशीच एक अत्यंत सामान्य समस्या म्हणजे गॅस. पनचसंस्थेतील काही त्रुटींमुळे पोटात गॅस होतात. घरगुती उपायांनी ते बरेही होतात. मात्र कधी कधी पोटातील गॅस जास्त वाढतो आणि त्यामुळे छातीवर ताण येतो. छातीचा त्रास म्हटल्यामुळे आपण लगेच घाबरतो मात्र घाबरु नका जाणून घ्या नक्की काय त्रास होतो. काही वेळा गॅसेसमुळे छातीवर ताण येणे ही एक सामान्य परंतु जरा त्रासदायक समस्या आहे. पचनसंस्थेतील वायूचा साठा वाढल्यामुळे छातीत जरा अस्वस्थता जाणवते. जळजळ व्हायला लागते. त्यामुळे छातीत दुखायला लागते.

या त्रासाला अनेक घटक कारणीभूत असतात. विविध प्रकारच्या बिया, राजमा, कोबी, कांदे, पावटा असे पदार्थ आणि कार्बोनेटेड्स असलेली पेये यामुळे गॅस जास्त प्रमाणात तयार होतो. तसेच अति खाल्यामुळे ते पचत नाही. अपचनामुळे गॅस तयार होतो. तो गॅस छातीच्या दिशेने जातो आणि त्यामुळे छातीत त्रास जाणवतो. श्वास घेताना काही तरी जड छातीत अडकल्यासारखे जाणवते. दुग्धजन्य पदार्थ पचवण्यास जर अडचण आली तर गॅस होतात.

केअरहॉस्पिटल्स या साईटवर सांगितल्यानुसार,गॅसेसमुळे छातीत



प्रेशर येणे सामान्य असले तरी ते टाळता येते. योग्य आहार, जीवनशैलीतील योग्य बदल आणि घरगुती उपायांनी या समस्येवर नियंत्रण ठेवता येते. मात्र लक्षणे तीव्र असतील आणि सतत उद्भवत असतील तर डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. जर छातीत वेदना डाव्या बाजूला व डाव्या खांद्यावर होत असतील आणि हातापर्यंत पसरत असतील तर काही तरी मोठी समस्या असण्याची शक्यता असते. श्वास घेण्यास त्रास होत असेल, उगाच घाम आला किंवा चक्कर येत असेल तर हे हृदयविकाराचे लक्षण असू शकते. अशा परिस्थितीत त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे योग्य ठरते. गॅसमुळे जर फारच ताण पडला तर त्याचा वाईट परिणाम होतो. त्यामुळे गॅस वाढवणारे वातूळ पदार्थ खाणे टाळा.

# प्रत्येक शेतकऱ्याच्या फोनमध्ये 'ही' ॲप असायलाच पाहिजे !
# हवामान अंदाज आणि पीक नुकसान टाळण्यासाठी करेल मदत

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

हवामानाचा अंदाज घेऊन शेतीकामाचे नियोजन केल्यास अवकाळी पाऊस व वादळवाऱ्यापासून पिकांची होणारी नासाडी काही प्रमाणात रोखली जाऊ शकते. सध्या पावसाचे दिवस सुरु झाले आहेत. वातावरणातील बदलामुळे शेतकऱ्यांना हवामानाची बिनचूक माहिती मिळावी, यासाठी कृषी विभागाने स्वतंत्र 'मेघदूत' प विकसित केले आहे.या पद्वारे शेतकऱ्यांना नियमित पाऊस, वादळ, तापमान यासह हवामानाची माहिती व योग्य सल्लाही मिळणार आहे. प्रत्येक शेतकऱ्याने हे ॲप डाउनलोड केले पाहिजे.

मेघदूत पचा वापर करावा

भारतीय हवामानशास्त्र विभाग, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि भारतीय उष्ण प्रदेशीय हवामान विज्ञान संस्था पुणे यांच्यातर्फे शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मेघदूत ॲप विकसित करण्यात आले आहे. मेघदूत ॲपचा वापर केल्यास शेतकऱ्यांना पिकांचे योग्य नियोजन करीत हवामानामुळे होणारे पिकांचे नुकसान टाळणे शक्य होणार आहे. त्यामुळे जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी मेघदूत ॲपचा वापर करणे अपेक्षित आहे.

**'स्कायमेट वेदर'वर जा, उपग्रह प्रतिमा पाहा**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

देशात यंदा दमदार पाऊस बरसणार असून, मान्सूनचा हंगाम सामान्य राहील, असा अंदाज स्कायमेट या हवामानविषयक अंदाज वर्तविणाऱ्या खासगी संस्थेने एप्रिल महिन्यात वर्तविला होता. मे महिन्यात भरपूर पाऊस झाला आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीपेक्षा अधिक पाऊस होईल, असाही अंदाज आहे.

**पेरणी असो की कापणी, मळणी; हवामानाचा अंदाज आवश्यक-** जिल्ह्यात मे महिन्यापासून अवकाळी पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे शेतीकामे प्रभावित झाली आहेत. आता लवकरच मान्सून पावसाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी करताना काळजी घेणे आवश्यक आहे. पेरणी असो की कापणी, मळणी, शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज घेणे आवश्यक आहे.

**अचूक अंदाज अन् कृषी सल्ला क्लिकवर मिळणार-** आधुनिक तंत्रज्ञानाचा शेतीत प्रभावी वापर करून शेतकऱ्यांचे निर्णय अधिक परिणामकारक करण्यासाठी कृषी विभागाने 'महाविस्तार ए.आय. प' उपलब्ध करून दिले आहे. हे प शेतकऱ्यांसाठी एक डिजिटल मार्गदर्शक ठरणार असून, त्यामध्ये पीकसल्ला, बाजारभाव, हवामान अंदाज, रोगनिदान तसेच योजनांसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

**आयएमडी' वेबसाइटवरही महत्त्वाची माहिती-** स्थानिक हवामानाच्या सध्या स्थितीची माहिती आणि भारतीय हवामान शास्त्र विभागाचे (आयएमडी) अधिकृत हवामान अंदाज आता 'भौसम' या मोबाइल प्लिकेशनवर



उपलब्ध आहे. मौसम या ॲपद्वारे नागरिकांना हवामानाची अद्ययावत माहिती, हवामान अंदाज आणि तीव्र हवामानाच्या घटनांचे इशारे मिळू शकतील.

पमधून शहरामधील तापमान, सापेक्ष आर्द्रता, वाऱ्याची दिशा, वेग, पर्जन्यमान, सूर्योदय, सूर्यास्त आणि चंद्रोदय चंद्रास्ताच्या वेळा, जवळच्या रडारद्वारे टिपलेली ढगांची स्थिती याबाबतची अद्ययावत माहिती मिळत आहे.

जिल्ह्यात धान, कापूस, सोयाबीन, तूर आदी पिक घेतल्या जाते. यामध्ये कोरपना, राजुरा, भद्रावती, वरोरा, चंद्रपूर, बल्लारपूर, जिवती या तालुक्यात कापूस तसेच सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतल्या जाते. तर चिमूर, सिंदेवाही मूल, ब्रह्मपुरी, नागभीड, गोंडपिपरी, बल्लारशा या तालुक्यात धानाचे सर्वाधिक उत्पादन घेतल्या जाते. सध्या शेतकरी शेतीच्या मशागतीच्या कामात व्यक्तत असून पावसाची वाट बघत आहे.

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# टाळ-मृदुंगात आधुनिकतेचा सूर, 'AI DIndi'तून अनुभवता येणार वारीतील नवचैतन्याची दिंडी!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७मुंबई-** जसा जून महिना जवळ येतो, तसे आषाढी एकादशीच्या वारीचे वेध लागतात. आषाढी वारी म्हणजे केवळ एक धार्मिक यात्रा नव्हे, तर ती आत्मिक शुद्धी, साधेपणा आणि त्याग शिकवणारी एक जीवनप्रवृत्ती आहे. पंढरपूरची वारी सर्व धर्म, जाती आणि वयोगटातील लोकांना एकत्र आणणारी, समाधान आणि शांती देणारी परंपरा आहे.

या ऐतिहासिक व पवित्र परंपरेत आधुनिक युगातील तरुणांना व नव्या पिढीला सहभागी करून घेण्यासाठी 'रळ-ऊळपवळ' नावाची एक अभिनव संकल्पना साकार झाली आहे.

रळ-ऊळपवळ ही पारंपरिक वारी आणि आधुनिक व्यवस्थापनाचा सुंदर संगम आहे. १८ वर्षांपूर्वी उदयास आलेली ही संकल्पना पूर्वी आयटी दिंडी या नावाने



ओळखली जात होती.

या उपक्रमात सामील होण्याची इच्छा असणाऱ्यांना 'मी गृहिणी आहे, निवृत्त आहे, आयटी क्षेत्रात नाही तरी सहभागी होता येईल का?', असे प्रश्न पडत होते. वारीत सहभागी होण्याची इच्छा असलेल्या अनेकांनी विचारलेल्या प्रश्नांनी या उपक्रमाच्या व्याप्तीत वाढ करण्याची गरज अधोरेखित केली. एकीकडे 'आयटी दिंडी' सुरूच ठेवून आता 'रळ-ऊळपवळ' म्हणजेच -श्रश्र खपलश्रीीळींश ऊळपवळ असा नवीन टप्पा सुरू करण्यात आला आहे.

आळंदी ते पुणे ह्या टप्प्यात पूर्वीप्रमाणेच आयटी दिंडी ह्या नावाने व्यवस्था कार्यरत राहील, पण वारीच्या पुणे ते पंढरपूर ह्या पुढील टप्प्यांसाठी 'एआय दिंडी' असणार आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ७ जून २०२५

शहर/ग्रामिण

# जिल्ह्यातील प्रकल्प अजूनही आटलेलेच ५६ प्रकल्पांमध्ये ४१.१६ टक्के जलसाठा

## मेळघाट मध्ये हि टंचाई ४ मध्यम प्रकल्पातील पाणी साठा जोत्याखाली गेला



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** यंदा उन्हाचा चटका वाढला. त्यामुळे पाण्याचा उपसा मोठ्या प्रमाणावर सुरु होता. मात्र, यावर्षी अवकाळी पावसाने हजेरी लावली. मात्र, तरीही प्रकल्पांची जलपातळी अर्ध्यावरच आहे. जिल्ह्यातील लघु, मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा अर्ध्यावरच आहे. जिल्ह्यातील ५६ प्रकल्पातील पाणीसाठा हा ४१.१६ टक्के आहे. यातील ४८ लघु प्रकल्पांपैकी तब्बल २७ प्रकल्प, तलाव कोरडे पडले असून ४ मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे. अनेक वाड्या, वस्त्यांवर पाणी टंचाई उद्भवली असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

गतवर्षी जिल्ह्यात झालेल्या संततधार तसेच प्रकल्प क्षेत्रातील पावसामुळे १ मोठा प्रकल्प, ७ मध्यम आणि ४८ लघु अशा ५६ प्रकल्पातील जलसाठ्यात वाढ झाली. तसेच यातील बरेच प्रकल्प ओव्हरफ्लोही झाले. मात्र, उन्हाळ्याची तीव्रता वाढली. बाष्पीभवनामुळे या ५६ प्रकल्पांचा जलसाठा कमी होत गेला. या सर्व प्रकल्पांमध्ये (दि. ६) रोजी आजघडीला ४१.१६ टक्केच जलसाठा आहे. २०२४ या सर्व प्रकल्पाचा आजच्या दिवशी (दि. ६) ३९.९४ टक्के इतका जलसाठा होता. दरम्यान यातील ४८ लघु प्रकल्पांपैकी २७ लघु प्रकल्प अजूनही कोरडे आहेत. त्यामुळे या प्रकल्पांवर अवलंबून असलेले गावांवर पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. जिल्ह्यातील मोठा प्रकल्प असलेल्या अप्पर वर्धा धरणाचा पाणीसाठा हा ४४.७५ टक्के आहे. तर सात मध्यम प्रकल्पात ४०.६७ टक्के जलसाठा शिल्लक आहे. तसेच ४८ प्रकल्पात ३२.८० टक्के जलसाठा शिल्लक राहिला आहे. यंदा मान्सून लवकर दाखल झाला असला तरी जिल्ह्यात पावसाने ब्रेक घेतला आहे. काही दिवसात दमदार पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. तत्पूर्वी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

जलसाठ्याची स्थिती प्रकल्प, पाण्याची टक्केवारी या क्रमाने :

अप्पर वर्धा ४४.७५, लघु प्रकल्प : ३२.८०, शहानुर : ४०.०१, चंद्रभागा : ६०.५१, पूर्णा : ५४.५९, सपन : ७१.१९, पंढरी : २१.८३, बोर्डी नाला : १४.०३, गर्गा : ००.००

# लग्न वऱ्हाडाच्या वाहनाचा भीषण अपघात,१४ गंभीर जखमी



## निंभारी फाट्याजवळील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अंजनगाव सुर्जी** – लग्नाचे वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या क्रुझर व प्रवासी ऑटोरिक्षामध्ये भीषण अपघात झाला. याअपघातात एकूण १४ जण गंभीर तर काही जण किरकोळ जखमी झाले. अंजनगाव सुर्जी–दर्यापूर मार्गावरील निंभारी फाट्यासमोर ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून जखमींना ग्रामस्थ, रुग्णसेवकांच्या मदतीने रूग्णवाहिकेतून ग्रामीण रुग्णालयात रवाना केले. दर्यापूर येथून लग्न वऱ्हाड घेऊन एमएच २२ यू ३१५४ क्रमांकाचे क्रुझर वाहनलग्नाचे वऱ्हाड घेऊन अंजनगावकडे येत होते. तर एमएच २७ एएफ ३०७६ क्रमांकाचा प्रवासी ऑटोरिक्षा अंजनगाव येथून दर्यापुरकडे जात होता. ऑटोरिक्षाला वाचविण्याच्या प्रयत्नात दोन्ही वाहने एकमेकांना धडकली. क्रुझर वाहन रस्त्याच्या कडेला जाऊन उलटले. यात एकूण १२ वऱ्हाडी गंभीर तर काही जण किरकोळ जखमी झाले. ऑटोरिक्षा चालकासह प्रवासीसुध्दा गंभीररित्या जखमी झाले. यासर्व जखमींना अंजनगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र काही लोकांना गंभीर स्वरूपाचा मार असल्याने त्यांना अचलपूर व अमरावती येथे रेफर करण्यात आले. पुढील तपास चिंचोली पोलीस ठाण्याचे एएसआय गजानन वर्मा, पो.कॉ. संजय गायकवाड, भारती भुस्कट करीत आहे.

### हे आहेत गंभीर व्हराडी–

नयना शिरसाट, आकांक्षा शिरसाट रा. दर्यापूर, गौतम सदांशिव रा. राजुरा, संतोष वानखडे रा. वरखेड, दादाराव वानखडे रा. कावसा, रंजना शिरसाट रा. दर्यापूर, श्रुती भोजने रा. दर्यापूर, पद्मा वानखडे, समीक्षा इंगळे, रिया राक्षसकर, अशोक शिरसाट, कैलास खडे सर्व रा. दर्यापूर तर ऑटोरिक्षा चालक प्रकाश परातमोल रा. एकलारा, संजय वानखडे रा. निंभारी यांचा जखर्मीमध्ये समावेश आहे.

# कुठल्याही अधिकाऱ्यांनी सर्वसामान्य लोकांची कामे अडवून नयेत

## जनतेच्या कामात हलगर्जीपणा खपवून घेणार नाही– खा.वानखडे




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अचलपूर**

१३अचलपूर उपविभागीय कार्यालयात नगरपरिषद कार्यालय अचलपूर येथे आज खासदार बळवंतराव वानखडे, अमरावती लोकसभा, यांच्या अध्यक्षतेखाली , मा. बबलू देशमुख, जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटी अमरावती ग्रामीण , बळवंत अरखराव उपविभागीय अधिकारी अचलपूर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या आढावा बैठकीत कृषी, विद्युत, सार्वजनिक बांधकाम, घरकुल , स्वच्छता , आरोग्य, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांन सोबत आढावा बैठक पार पडली यात खासदार बळवंतभाऊ वानखडे यांनी अधिकाऱ्यांना जनतेचे कामे करण्याचा सणसणीत इशारा दिला जनतेच्या समस्या ऐकून घेत, पक्षपात न करता कामे मार्गी लावण्याचे सक्त आदेश खासदार महोदयांनी दिले. खासदार महोदयांनच्या कडक इशारा मुळे अचलपूर मधील नागरिकांची कामे रखडवणाऱ्यांवर आता वचक बसणार!यावेळी दोन्ही जागेवर काँग्रेस पक्षातील कार्यकर्ता पदाधिकारी आणि नागरिक मोठी संख्या मध्ये उपस्थित होते.अचलपूर तालुका ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष तनपुरे, शहर काँग्रेस अध्यक्ष श्रीकांत झोडपे, सागर व्यास, अनु. जाती विभाग अध्यक्ष राहूल गाठे, राजेश हीवराळे, सेवादल अध्यक्ष सचिदानंद बेलसरे, शहर अल्पसंख्यांक अध्यक्ष कदीर पहेलवान, ओबीसी अध्यक्ष दिनेश वानखडे, अल्पसंख्यांक नेते राजीकभाई व अनीशभाई, महिला तालुका अध्यक्ष अश्विनीताई पेटकर, तसेच युवक काँग्रेस अध्यक्ष अंकुश ठाकरे व इतर काँग्रेस उपस्थित होते

# शहरातील बहुतांश मार्ग व्यावसायिक व हॉकर्सने केले गिळंकृत

## नागरिकांच्या मनपाकडे सतत तक्रारी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती** – शहरातील मुख्य रस्त्यांच्या दोन्ही बाजुला फुटपाथ असले तरी ते व्यावसायिक व हॉकर्सने गिळंकृत केल्यामुळे जणू गायबच झाल्यासारखी स्थिती आहे.

फुटपाथचा वापर हा मुख्य रस्त्यांवर पदचाऱ्यांना सुरक्षितपणे चालण्यासाठी असताना शहरात या नियमाचे कुठेही पालन होताना दिसत नाही. उलट फुटपाथच्या बाहेर येऊन मुख्य रस्त्यापर्यंत अतिक्रमण करण्याची व्यावसायिकांना सवयच जडल्यामुळे रस्त्यांचा आकारही लहान झाला आहे. शहराची लोकसंख्या, वाहने वाढत असल्याने आधीच रस्ते लहान पडायला लागले असताना फुटपाथवरील अतिक्रमण काढणे गरजेचे आहे. परंतु, जनप्रतिनिधी, मनपाचे याकडे अजिबात लक्ष नाही.

फुटपाथ जणू आपल्यासाठीच आहेत, अशा आर्विभावात व्यावसायिक वागतात. त्यांच्या ट्रेंडी, वस्तू, जाळ्या, जाहिराती, खुर्च्या असे सर्वकाही फुटपाथवर राहते. फुटपाथ तर सोडाच रस्त्यावरही अतिक्रमण करण्यास हे मागेपुढे बघत नाहीत. मुख्य बाजारपेठ असोत अथवा शहरातील इतर कोणतेही रस्ते. फुटपाथ गायब झाल्यामुळे नागरिकांना रस्त्यांवरून चालावे लागत आहे. नागरिकांच्या मनपाकडे सतत तक्रारी धडकतात. अतिक्रमण निर्मुलन पथक कारवाईही करते. परंतु, पथक निघून गेले की, काही वेळातच पुन्हा जैसे थे स्थिती होते. मनपा प्रशासनाने कठोर कारवाईचा बडगा उचलला तर मग राजकीय हस्तक्षेप आडवा येतो. त्यामुळे सर्वसामान्यांना कोणीही शहरात वाली उरले नाही.

शहरात बहुतांश रस्ते हे ६० फुटांचे आहेत. परंतु, व्यावसायिकांनी फुटपाथ, रस्त्यांच्या कडेला असलेली जागा ही आपल्याच मालकीचे असल्याचे समजून तेथे अतिक्रमण केल्यामुळे दुकानात येणारी वाहने पार्क केली जात असल्याने एकूण ६० फुटांच्या रस्त्यांचा आकार हा सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत ३० फुटापर्यंत कमी होतो. त्यामुळे रस्त्यांवर चांगलीच गर्दी असते.

# बकरी ईदच्या पूर्वसंध्येला कत्तलीसाठी आणलेल्या ११ जनावरांची सुटका

## संत्र्याच्या बागेत ठेवले होते लपवून, शेंदूरजनाघाट पोलिसांची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ वरुड**– वरूड तालुक्यातील शेंदूरजनाघाट पोलिसांनी बकरी ईदच्या पुर्वसंध्येला मिळालेल्या माहितीच्या आधारे सकाळी ९ वाजता एका संत्र्याच्या शेतातून कत्तलीसाठी आणलेल्या ११ गोवंशांची सुटका केली आहे. ही कारवाई पुसली धरणाजवळील शेतात केली.

कत्तलीसाठी बांधलेल्या ११ गोवंश जातीच्या जनावरांपैकी ६ जनावरे धरणाजवळील नाल्यामध्ये चारापाण्याविना बांधलेल्या अवस्थेत आढळली. तर उर्वरित ५ जनावरे शेजारील दुसऱ्या ठिकाणी आढळली. या जनावरांची एकूण किंमत सुमारे ८९,००० रुपये आहे. या प्रकरणी आरोपी रजा उर रहमान शेख नासीर (रा. करजगांव, शे.घाट) आणि जुबेर अहमद जमील अहमद (रा. शेगाव) यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन शे. घाट येथे भारतीय दंड संहिता कलम ५(अ), ९ म.प्रा.सं. अधी सह कलम ११(१) (एफ) (एच) प्रा.छ. प्र.अधी १९६० नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधीकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात शेंदूरजनाघाटचे सहायक पोलीस निरीक्षक दिपक महाडीक, दुय्यम पोलीस निरीक्षक मंगेश शेगोकार यांसह पोलीस फौजदार रविंद्र दातीर, संजय रोतवाल, विरेंद अमतकर, संदीप वानखडे, सागर लेव्हरकर, नितीन ठाकरे, इंद्रजित चौधरी, उमेश कुंभेकर आणि महेश बारबुधे यांनी केली.

# रंगीबेरंगी रेनकोट, छत्र्यांनी बाजार सजला: बाजारपेठेत खरेदीसाठी महिला, युवतींसह तरुणाईची लगबग

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.७अमरावती** – पावसाळ्यात बच्चे कंपनीपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच रेनकोट, छत्र्यांचे आकर्षण असते. आपली छत्री अथवा रेनकोट इतरांपेक्षा वेगळी आणि आकर्षक कसे दिसेल. याकडे विशेष लक्ष देत नागारिक खरेदी करत असून त्यांच्या पसंतीला पडणाऱ्या विविध रंगी रेनकोट, छत्र्यांनी बाजार सजला आहे.

विशेष करून इतवारा बाजार, अंबादेवी रोड, राजकमल, श्याम चौक, सरोज, प्रभात चौक या भागांतील होलसेल बाजारपेठेत व दुकानांत ग्राहकांची गर्दी दिसत आहे. या जून महिन्यात येणाऱ्या पावसाची चाहूल लागताच अनेक नागरिक अडगळीच्या खोलीत ठेवलेल्या छत्र्या शोधण्याची घाई करतात. घरातील जुनी छत्री दुरुस्त करून घेतली जात आहे. तर बाजारपेठा पावसाळी वस्तूंनी सजत आहेत. या वर्षीही ग्राहकांच्या पसंतीस उतरतील अशा वस्तू व्याक्सायिकांनी बाजारात उपलब्ध केल्या आहेत. शाळांना होणारी सुरुवात व पावसाचे आगमन यामुळे दरवर्षी हा हंगाम



व्यावसायिकांना लाखो रुपयांचे उत्पन्न देऊन जातो. त्यामुळे व्यावसायिकांच्या नजरा आकाशाकडे लागलेल्या असतात. उर्वरित. पान ४ साहित्य किंमत (रुपये ) मोठी छत्री ३०० ते ४०० लहान छत्री १५० ते ३०० फोल्डिंग छत्री ४०० ते ६०० रेनकोट साधा ३०० ते ५०० ट्रान्सपरंट रेनकोट ३०० ते ४०० चेन रेनकोट ५०० ते ९०० मिड टॉप ५०० ते १ हजार लॉंग रेनकोट ७०० ते १५०० लहान मुलांसाठी कार्टून, सुपरमॅन खास आकर्षण स्पायडरमॅनचे चित्र असलेले रेनकोट लहान मुलांना फार आवडतात. चेन रेनकोट, मीड टॉप, लौंग रेनकोट, कलरफूल असे नानाविध प्रकारचे रेनकोट बाजारात उपलब्ध आहेत. फुलांचे, फळांचे आणि बार्बीचे चित्र असलेले रेनकोट मुलींना आवडतात. त्याचप्रमाणे सुपरमॅन, पॉकीमॅन, डोरेमॉन, स्पायडरमॅन, अँटमॅन, मोटू–पतलू असे नाना विविध चित्र असलेले रेनकोट बच्चे कंपनीच्या आवडीत उतरत आहेत. तसेच लहान मुलांसाठी पतंगाच्या आकाराची छत्री, आकर्षक डिझाईन तसेच मिकी माऊसचे चित्र असलेल्या छत्र्या अशा विविध प्रकारच्या छत्र्या बच्चे कंपनीसाठी आकर्षण ठरत आहेत.

# बच्चू कडू यांनी व्यंगचित्राच्या माध्यमातून सरकारला विचारले प्रश्न





शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्यावरून बच्चू कडू पुन्हा आक्रमक...उद्यापासून बच्चू कडू अमरावतीच्या गुरुकुंज मोझरी मध्ये करणार अन्नत्याग आंदोलन.शेतकरी, अपंग, दिव्यांग,शेतमजूर, यांच्या साठी आंदोलन..उद्या अमरावती मधील संत गाडगेबाबा मंदिरा पासून ते तुकडोजी महाराज यांच्या मोझरी येथील समाधी पर्यत काढणार बाईक रॅली.बाईक रॅलीत २० हजार शेतकरी आणि कार्यकर्ते येणार असल्याचा दावा..

# शिवराज्याभिषेक सोहळा तारखेनुसार नव्हे, तिथीनुसार साजरा होणार, खुद्द मुख्यमंत्र्यांनी दिली परवानगी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७नागपूर –** महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य आणि संस्कृतीचे प्रतीक असलेले छत्रपती शिवाजी महाराज हे राज्यासाठी आराध्य दैवत आहेत. त्यांची धैर्य, नेतृत्वगुण आणि न्यायप्रियता महाराष्ट्रातील लोकांसाठी प्रेरणादायक आहे. शिवाजी महाराजांनी जनतेच्या मतांवर भर देऊन स्वराज्य स्थापन केले. शिवाजी महाराज महाराष्ट्राच्या इतिहासात एक आदर्श राजा म्हणून ओळखले जातात. छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा ६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर पार पडला. हा दिवस मराठी इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि गौरवशाली घटना मानली जाते. या दिवशी शिवाजी महाराजांचा विधीपूर्वक अभिषेक झाला आणि त्यांनी औपचारिकपणे 'छत्रपती' ही उपाधी धारण केली. शिवप्रेमी दरवर्षी ६ जूनला मोठ्या जल्लोषात शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करतात. मात्र यंदा हा सोहळा तिथीप्रमाणे ९ जून रोजी साजरा करण्यात यावा अशा आशयाचे परिपत्रक राज्याच्या विधी व न्याय विभागाने शुक्रवारी काढले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या परवानगीने हा निर्णय घेतला गेला असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### तिथीनुसार साजरा करा

सरकारी व शैक्षणिक संस्थांमध्ये ६ जूनच्या दिवशी विशेष कार्यक्रम, व्याख्याने व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या दिनांकाबाबत तारीख आणि तिथी यामध्ये काही प्रमाणात गोंधळ व मतभेद आढळतो. ऐतिहासिक दृष्टिकोनातून शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर झाला होता. ही तारीख ग्रेगोरियन कॅलेंडरनुसार निश्चित करण्यात आलेली असून, सरकारी दस्तावेज आणि बहुतेक शालेय-पुस्तकांमध्ये याच तारखेचा उल्लेख आढळतो. मात्र, हिंदू पंचांगानुसार हा अभिषेक ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी या तिथीला झाला होता. चंद्रमान पंचांगामुळे ही तिथी दरवर्षी बदलते आणि कधी ५ जून, कधी ७ जून किंवा इतर तारखेला येते. त्यामुळे काही ठिकाणी राज्याभिषेक दिन पंचांगानुसार साजरा केला जातो. यंदा तिथीनुसार राज्याभिषेक दिन ९ जून रोजी येत आहे. या पार्श्वभूमीवर २ जून २०२५ रोजी बार काउंसिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाच्या सदस्याने तिथीनुसार राज्याभिषेक साजरा करण्याबाबत पत्र पाठविले होते. विधी व न्याय विभागाने ५ जून रोजी याबाबत पत्र पाठविले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता प्रदान केल्यावर ६ जून रोजी कार्यासन अधिकारी वैशाली बारुडे यांच्या नावाने परिपत्रक काढले गेले. परिपत्रकानुसार, राज्याच्या न्याय व विधी विभागाच्या अंतर्गत येणारे सर्व कार्यालये तसेच राज्यातील सर्व जिल्हा व सत्र न्यायालयात, सरकारी वकीलांच्या कार्यालयात ९ जून रोजी तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात येणार आहे.



# पावसाची विश्रांती; पारा ३८ अंशावर, तापमानामध्ये ६ अंशसेल्सियसने वाढ

## उद्यापासून मृग नक्षत्र, उन्हाने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती–** मागील चार ते पाच दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली आहे. मात्र, तापमानाचा पारा पुन्हा भडकल्याने प्रचंड उकाडा वाढला आहे. अवघ्या आठवड्याभरात पारा तब्बल आठ अंशाने वाढला आहे. गुरुवारी २९.२ वर असलेला पारा शुक्रवार, दि. ६ जूनला चक्क ४० अंशावर पोहोचला आहे. वाढत्या उकाड्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. उद्या रविवार दि. ८ जूनपासून मृग नक्षत्राला सुरुवात होत आहे. मशागती आटोपून घेतलेले शेतकरी पेरणीच्या तयारीत आहेत. त्यामुळे दमदार पावसाची अपेक्षा शेतकऱ्यांसह नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

कधी नव्हे ते यंदा मे महिन्यात जोरदार पाऊस झाला. सलग वादळी वारा, विजांच्या कडकडाटात कोसळलेल्या पावसाने शेकडो घरांची पडझड झाली. हजारो हेक्टरवरील गहू, हरभरा, तिळ, भुईमूग पिकांचे नुकसान झाले. छोट्या, मोठ्या नाल्यांना पूर आला. प्रकल्पातील जलसाठ्यातसुद्धा वाढ झाली. त्यामुळे यंदा पेरण्यांना लवकरच सुरुवात होईल, अशी शक्यता वर्तविण्यात आली होती. विशेष म्हणजे मान्सूनचे आगमनसुद्धा निर्धारीत कालावधीत होईल, असे हवामान विभागाने स्पष्ट केले होते. मात्र, मागील चार ते पाच दिवसांपासून वातावरणात पुन्हा बदल झाला आहे. सलग कोसळणाऱ्या पावसाने तापमानात घट झाली होती. रविवारपासून मृग नक्षत्राला सुरुवात होणार आहे. या नक्षत्रात चांगला पाऊस होईल,




अशी शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. परंतु, वाढत्या तापमानामुळे पाऊस निर्धारीत कालावधीत पडणार की नाही, असा प्रश्न सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांमोर उभा ठाकला आहे.आठवड्याभरापूर्वीच २९.२ अंशसेल्सियस तापमानाची नोंद घेण्यात आली होती. परंतु, पावसाने घेतलेल्या विश्रांतीने पुन्हा पारा भडकला आहे. आत चक्क आठ अंशसेल्सियसने तापमानात वाढ झाली आहे. शुक्रवार दि. ६ जून रोजी ४०.४ अंशसेल्सियस तापमानाची नोंद घेण्यात आली आहे. अचानक वाढलेल्या तापमानामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.बदलत्या वातावरणामुळे आरोग्यावर परिणाम गेल्या काही दिवसांपासून तापमानात वाढ होत आहे. या बदलत्या हवामानामुळे आरोग्यावर दुष्परिणाम होत आहेत. गेल्या आठ दिवसांपासून वातावरणात झालेल्या बदलामुळे अंगदुखी, निरुत्साहीपणा, डोके दुखणे, सर्दी, ताप, खोकला अशा आजारात वाढ झाली आहे. घरातील मोठ्यापासून ते लहानापर्यंत सर्दी, खोकल्याचे रुग्ण दिसत आहेत. शासकीय रुग्णालयातसह खासगीतही रुग्णांची गर्दी दिसून येत आहे.

# महिलेची ऑनलाईन २५.५३ लाखांनी फसवणूक

## गुंतवणुकीवर अधिक परताव्याचे दाखविले होते आमिष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ अमरावती –** गुंतवणुकीवर अधिक परताव्याचे आमिष दाखवून एका २६ वर्षीय महिलेची तब्बल २५ लाख ५३ हजार ४३८ रुपयांनी ऑनलाईन फसवणूक केल्याची घटना बेनोडा पोलिस स्टेशन हद्दीत घडली. महिलेच्या तक्रारीवरून बेनोडा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.



महिला बेनोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी असून, तिच्याशी सोशल मीडियावर 'जसमित सिंग' नामक व्यक्तीने संपर्क साधला. त्याने स्वतःला 'न्यूझीलंड गोल्ड मर्चेंट्स लिमिटेड' या कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे भासवून 'गोगोल्ड' नावाची लिंक पाठवली. या लिंकवर क्लिक करताच तिला 'वैष्णवी सोनार' नावाचे एक ऑनलाईन गुंतवणूक खाते उघडून देण्यात आले.यानंतर आरोपीने 'फायनान्स ॲडव्हायजर' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून सतत कॉल व मेसेज करून अधिक रिफंड मिळेल, असा विश्वास निर्माण केला. त्याला बळी पडून महिलेने विविध ऑनलाईन माध्यमांतून एकूण २५.५३ लाख रुपये गुंतवले. प्रारंभी काही काळ तिला नफा मिळाल्याचे दाखवण्यात आले. मात्र, रक्कम ट्रान्सफर वा विड्रॉल होत नसल्याचे लक्षात येताच तिने चौकशी केली.त्यावेळी आणखी पैसे भरल्यास रक्कम मिळेल, असे सांगण्यात आले. महिलेला फसवणुकीची जाणीव होताच महिलेने बेनोडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. ऑनलाईन गुंतवणुकीच्या नावाखाली नागरिकांची फसवणूक वाढत असल्याने सतर्क राहण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.–


# बुलडाणा शहरात अनेक ठिकाणी जलवाहिन्या फुटल्या, पाण्याची नासाडी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.७बुलडाणा–** मे महिन्यातील पावसामुळे येळगाव येथील रामसिंग देवसिंग भोंडे जलाशयातील साठा वाढला असला तरी तो पुरेसा वाढलेला नाही. त्यामुळे पाणी वाया जाणार नाही याकडे नगर पालिकेने लक्ष देणे आवश्यक आहे. मात्र आज शहरातील अनेक ठिकाणच्या जलवाहिन्या फुटल्या होत्या. तर बसस्थान परिसरातील भागात गढूळ पाणी पुरवठा झाला होता. वारंवार जलवाहिन्या का फुटतात, अन् त्यावर होणारा खर्च बघता याचा कायमस्वरुपी उपाय करणे गरजेचे आहे.

बुलडाणा नगर पालिकेत ३० वार्ड असून पाणी वितरण व्यवस्थेचेही झोन पाडण्यात आले आहे. त्यानुसार काही भागात समान तर काही सखोल भागात पाणी वितरीत करतांना कमी अधिक पाणी लोकांना मिळत आहे. पाणी करदाते जवळपास १२ हजार आहेत. या करदात्यांना शुध्द जल पुरवठा करणे पालिकेच्या हातात आहे. पालिकेने त्या दृष्टीने प्रयत्न केले असलेतरी पाणी पुरवठा केव्हा होईल, हे निश्चित सांगितले नाही.

त्यामुळे आज नळ येतील याचा अंदाज बांधुनच महिला आपली कामे उरकत असतात. अनेकांनी बोअर घेतले असून त्यांचेकडे बोअरचे पाणी वापरल्या



जात आहे. त्यामुळे पालिकेवरील पाणी पुरवठ्याचे बरेच ओझे कमी झाले आहे. तरीही बोअर कधी धोका देईल सांगता येत नसल्याने काहींनी नळही घेतले आहे. याच नळाला गढूळ पाणी पुरवठा होत असल्याने जलजन्य आजार वाढण्याची शक्यता अधिक आहे. परिसरात पाच ठिकाणी फुटली जलवाहिनी बस स्थानका मागील भागात वारंवार जलवाहिनी फुटत असते. पालिका ती दुरुस्तही करते मात्र काही महिने जाताच ती पुन्हा फुटते. त्यामुळे लाखो लिटर पाणी वाया जात आहे.या भागातील लाईनमन त्या जलवाहिन्यांची माहिती देण्यासाठी किंवा पाहणी करण्यासाठी असतोच असे नाही. तो ती माहिती पुरवतो की पुरविल्यानंतही पालिका त्याकडे दुर्लक्ष करते, हे सांगता येत नाही. एकाच भागात पाच ठिकाणी या जलवाहिन्या फुटल्या आहे. त्यामुळे रस्त्याने पाणी वाहत जात असून नागरिकांना मात्र पाणी पुरवठा कमी होत आहे.

# पाकिस्तानहून परतलेली सुनीता जामगडे मानसिक रुग्ण?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७नागपूर :** कपिलनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत संत कबीर नगर भागात राहणारी सुनीता जामगडे काही दिवसांपूर्वी नियंत्रण रेषा (एलओसी) ओलांडून पाकिस्तानात गेली होती. सुनीता कारगिलजवळील हुंदरमन गावातून पाकिस्तानात गेली आणि तेथील एका धर्मगुरूला भेटली. याप्रकरणी नागपूर पोलिसांनी तिला अटक करून जेएमएफसी न्यायालयात हजर केले होते. न्यायालयाने तिला २ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते. कोठडी संपल्यानंतर तिला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले आणि न्यायालयाने तिला न्यायालयीन कोठडीत पाठवले. सध्या ती नागपूरच्या मध्यवर्ती कारागृहात आहे. या प्रकरणात तिला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत मोफत वकील देण्यात आला आहे. न्यायालयीन कोठडीत असणाऱ्या सुनीता जामगडेच्या जामीनासाठी अर्ज दाखल केला जाणार असल्याची सुरुवातीला चर्चा होती, मात्र जामीन अर्ज दाखल न करता सुनीताच्या मानसिक स्थितीबाबत अर्ज दाखल केला गेला.

### प्रकरणाला नवे वळण



दुसरीकडे सुनीता जमगाडेचा प्रोडक्शन वारंट घेण्यासाठी कारगिल पोलीस नागपूरच्या न्यायालयात अर्ज केला होता. परंतु आवश्यक न्यायालयिन कागदपत्रे न दिल्याने तूर्तास त्यांना वॉरंट मिळू शकलेला नाही. त्यामुळे कारगिल पोलीस सुनीताला सोबत न देताच परत गेली.

### मानसिक परीक्षणासाठी अर्ज

सुनीता ४ मे रोजी स्वतःच्या १२ वर्षीय मुलासोबत घरून निघाली होती. कारगिल बॉर्डरवरील शेवटचे गाव असलेल्या हुंदरमानमध्ये ती पोहोचली. तिथे गेल्यानंतर मुलाला परत येते असे सांगून एकटीच निघून गेली. तत्पूर्वी मुलाला घरी पाठवत असल्याचे बहिणीला फोन करून सांगितले. स्थानिक लोकांनी मुलाला लद्दाख पोलिसांच्या स्वाधीन केले होते. यानंतर नागपूर पोलिसांनी तिला ताब्यात घेतले. सध्या सुनीता न्यायालयीन कोठडीत आहे. या प्रकरणात तिला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत मोफत वकील देण्यात आला आहे. ड.प्रशांत परीपवार यांच्यामार्फत सुरुवातीला तिच्या जामिनासाठी अर्ज दाखल करण्यात येणार होता.

# चारित्र्यावर शिंतोडे; विवाहितेला काढले घराबाहेर ! हुंड्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती :**हुंड्याची मागणी करून व चारित्र्यावर शिंतोडे उडवून एका ४२ वर्षीय विवाहितेला घराबाहेर काढण्यात आले. तिला बेदम मारहाण करण्यात आली. सन २०२४ पासून ती छळ मालिका चालली. अखेर त्या महिलेने माहेर गाठत जवळचे पोलिस ठाणे गाठले. याप्रकरणी दत्तापूर पोलिसांनी राजेश व एक महिला (दोन्ही रा. नागपूर) व संजय एक महिला (दोघेही रा. आर्वी) यांच्याविरुद्ध ५ जून रोजी कौटुंबिक छळाचा गुन्हा दाखल केला.तक्रारकर्त्या ४२ वर्षीय विवाहितेचा पती राजेश हा शिक्षक आहे. लग्नानंतरपतीने फिर्यादीला पत्नी म्हणून दर्जा दिला नाही. घरातील नौकरानीसारखी वागणूक दिली. अकारण वाद घालून तिला मारहाण केली. पती, सासू, भासरा व जाऊने तिला हुंड्यासाठी तगादा लावला.

जाऊकडूनही छळफिर्यादीची पहिली मुलगी राजेश याची नसून ती कुण्या दुसऱ्याची आहे, असे सासूला सांगून जाऊने फिर्यादीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविले. २९ डिसेंबर २०२४ रोजी पती राजेशने अकारण आपल्याशी पैशाच्या कारणावरून वाद घातला. धक्काबुक्की करून मारहाण केली. तो एवढ्यावरच थांबला नाही, तर तिला घरातून हाकलूनदेखील दिले.

# मोर्शीत भरदिवसा महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरले

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७ मोर्शी



मोटरसायकलवरून आलेल्या इसमाने कार्यक्रमातून घरी परत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील २५ ग्रॅम वजनाची सोन्याची पोथ किंमत अंदाजे १ लाख २० हजार रु. खेचून चोरी केल्याची घटना शहरातील असराणी ले-आऊटजवळ ५ जूनला भरदुपारी २.३० वाजता घडली याप्रकरणी मोर्शी पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

अश्विनी पवनराव राऊत रा. गजानन कॉलनी सिंभोरा रोड मोर्शी असे तक्रारदार महिलेचे नाव आहे. त्या ५ जूनला त्यांच्या घराशेजारी राहणाऱ्या एका इसमाच्या मुलाचे रिसेप्शन असल्याने वृंदावन मंगल कार्यालय येथे गेल्या होत्या. जेवण करून त्या व त्यांच्यासोबत असलेल्या दोन महिला दुपारी १.३० च्यादरम्यान पायदळ घरी येत असताना असराणी ले-आऊट जवळ एक इसम काळ्या रंगाच्या मोटरसायकलवर समोरून आला व त्याने त्या महिलेला धक्का देवून गळ्यातील २५ ग्रॅमचे मंगळसूत्र किंमत अंदाजे १ लाख २० हजार हिसकावले. दरम्यान ती महिला त्या मोटरसायकल चोरट्याच्या मागे धावली व आरडाओरडसुद्धा केली; परंतु तेवढ्या वेळामध्ये तो चोरटा पळून गेला.झालेल्या घटनेमुळे त्या घाबरून गेल्या व घरी जाऊन त्यांनी या घडलेल्या घटनेची माहिती त्यांचे सासरे रामरावजी राऊत यांना व त्यांच्या पतीला फोनवरून माहिती दिली. याप्रकरणी त्यांनी मोर्शी पोलिसस्टेशन येथे तक्रार दिली असून मोर्शी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार कलम ३०९ (४) अन्वये गुन्हा दाखल केला असून मोर्शी पोलिस पुढील पास करीत आहे.

पंधरा दिवसांपूर्वी सुद्धा शहरातील शंकरनगर येथे लग्नातून परत येणाऱ्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र ओढून चोरण्याचा प्रयत्न केला होता. परंतु ते मंगळसूत्र खाली जमिनीवर पडल्याने यात चोरटा यशस्वी होऊ शकला नाही. लागोपाठ होत असलेल्या या घटनेमुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# सत्काराने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते- प्रकाश मारोटकर

## दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा शिवसेनेतर्फे सत्कार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७नांदगाव खंडेश्वर



ठाकरे गटाच्या शिवसेनेने वर्ग दहावी व बारावीमध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार ज्ञानेश्वरी ग्रंथ शॉल देऊन सत्कार केला. या वेळी सत्काराने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते व त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप ठेवली कि विद्यार्थ्यांना आकाशा एवढे बळ मिळते. असे प्रतिपादन शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी केले.

नांदगाव शहरातील वर्ग १० वी व १२ विमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त करणार्या विद्यार्थ्यांचा सत्कार प्रत्येकांच्या घरी जाऊन त्यांच्या आई वडीलासह करून विद्यार्थ्यांना ज्ञानेश्वरी ग्रंथ देऊन शॉल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला यामध्ये वर्ग १० मधील वाय इ एस शाळेची विद्यार्थ्यांनि श्रेया गजानन काकडे ९३.४० टक्के गुण शिवाजी शाळेची प्राजक्ता केशव दैत ९४. ४९ टक्के गुण एकलव्य शाळेची पायल शिरभाते ९१ टक्के गुण स्कूल ऑफ स्मार्ट शाळेचा अथर्व चव्हाण ९६ टक्के गुण हितेश डोफे ९० टक्के गुण वर्ग १२ मध्ये शिवाजी शाळेची विधी खिची ८२.५० टक्के गुण पल्लवी जंगले ८२.१७ टक्के गुण तसेच अपंग विद्यार्थ्यांन मधून वर्ग १० वी मध्ये प्रसन्न देशमुख याने ७२ टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळविला.

या वेळी शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर माजी नगरसेवक निलेश झखार, माजी जि प सदस्य वासुदेव लोखंडे, गजानन नागोलकर, सुनील गुरमुळे, रवी ठाकूर, गुणवंत चांदूकर, गोपाल बनकर, पवन शिरभाते, चेतन डकरे, सुमित लोमटे, अक्षय हिवराळे, शुभम रावेकर, आदित्य देशमुख, प्रेम हिवराळे आदी शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# डुक्कर आडवे आल्याने गंभीर जखमी झालेल्या दुचाकी चालकाचा मृत्यू



विदर्भ प्रजासत्ताक
दि.७बेलोरा

भरधाव दुचाकीसमोर अचानक डुक्कर आडवे आल्याने झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा अखेर उपचारादरम्यान मृत्यू झाला.

प्रफुल्ल प्रभाकरराव शेंडे (३५) रा. शिरजगाव बंड हा युवक व त्याचा मित्र शिवपाल गडपावले मोपेड दुचाकीने काही कामानिमित्त परतवाडा गेलेहोते. परत येत असताना जमापूर फाट्यावर सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास दुचाकीसमोर अचानक डुक्कर आडवे आले. त्यामुळे प्रफुल्ल शेंडे यांच्या ताब्यातील दुचाकी अनियंत्रित होवून पडली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यांना गंभीर जखमी अवस्थेत काही लोकांनी प्रथम ग्रामीण रुग्णालय चांदूरबाजार येथे भरती केले. प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना तेथून अमरावती येथे रेफर करण्यात आले. जिल्हा सामान्य रूग्णालयातून त्यांना सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले होते. तेथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.याप्रकरणी चांदूरबाजारचे ठाणेदार कृष्णा पांडे यांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास जमादार गणेश हागे, रेखा चव्हाण करीत आहे.

# पीडीएमसी येथे अत्याधुनिक एंडोस्कोपी मशीनचे उद्घाटन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती



श्री शिवाजी शिक्षण संस्थाव्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे सर्वच प्रकारच्या अत्याधुनिक आरोग्य सोयीसुविधा संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, तसेच सर्व पदाधिकारी यांचे मार्गदर्शन व सहकार्याने उपलब्ध झालेल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना व बी.पी.एल. योजनांमुळे शहरी व ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना मोठ्या प्रमाणात उपलब्ध आरोग्य सोयीसुविधांचा मोफत लाभमिळत आहे.

अत्याधुनिक सोयी सुविधेचा एक भाग म्हणून ऑलम्पस १७० एन्डोस्कोपी मशीनचे उदघाटन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्याहस्ते तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे, सर्जरी विभाग प्रमुख डॉ. अनिल दारोकर,एन्डोस्कोपी सर्जन डॉ. राम गट्टानी, गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजीस्ट डॉ. अमित डफळे, डॉ. आर. एम. मुलमुले, डॉ. अतुल यादगिरे, डॉ. शशी चौधरी, देवेन्द्र श्रीवास्तव, हॉस्पिटल मॅनेजर डॉ. श्रीकांत फुटाणे, ऋग्वेददेशमुख, किशोर इंगळे, सचिन देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्जरी ओटी कॉम्प्लेक्स-२ येथे गुरुवार ५ जून रोजी पार पडले. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

एंडोस्कोपी मशिनचा वापर शरीरातील अवयवांचे आणि इतर रचनांचे फोटो किंवा व्हिडीओ काढण्यासाठी होतो. आरोग्यसेवा प्रदाते या सुविधेचा वापर शस्त्रक्रियेपूर्वी रोगांची तपासणी, निदान आणि उपचार करण्यासाठी करतात. रुग्णालयात लवकरच ब्रांकोस्कोपी व एआरसीपी युनिट सुरू करण्याचा संस्थेचा मानस आहे. त्यामुळे रुग्णांच्या पोटाच्या विकारासंबंधीच्या तपासण्या दुर्बिणव्दारे होतील.सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता इन्चार्ज सिस्टर संध्या वाघमारे, स्टाफ नर्स प्रियंका मईद, कल्याणी निरटकर, एन्डोस्कोपी टेक्निशियन राहील शेख, रूपेश धाकडे, शिवम तसरे यांनी सहकार्य केले. यावेळी सर्जरी विभाग व रूग्णालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# शहरात बोगस पॅथॉलाजींचा नागरिकांच्या जिवाशी खेळ

## आरोग्य विभागाने कारवाई करणे गरजेचे

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७ बडनेरा



रुग्णाच्या शरीरातील आजाराचे नेमके निदान होण्यासाठी विविध प्रकारच्या तपासण्या पॅथॉलॉजीकडून केल्या जातातः मात्र आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या लॅब सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. ज्यांच्याकडे लॅब टेक्निशियन व कुठलीही सुविधा नाही, असे लोकही दुचाकीवर रक्त संकलन करून रुग्णाला रिपोर्ट देत असल्याची चर्चा आहे. शहरात सर्वत्र राजरोस सुरू असलेल्या या प्रकारामुळे रुग्णांची आर्थिक लूट होऊन त्यांची मृत्यूशी गाठ होऊ शकते. याला आळा घालण्यासाठी तत्काळ उपाययोजना करण्याची गरज आहे.

सध्या स्वतःचे आरोग्य सांभाळणे फार आवश्यक झाले आहे. कारण दवाखान्याचा खर्च आवाक्याबाहेर गेला आहे. सध्या ताप आला तरी तर रक्त तपासणी, डॉक्टर फी खर्च जवळपास १ ते २ हजार रुपये होतो. गंभीर आजाराच्या तपासण्यांचा खर्च विचारूच नका.

आणखी एक गंमत म्हणजे संबंधित डॉक्टर रेफर करतात, त्याच लॅबमध्ये तपासणी करण्याचा सल्ला डॉक्टर पेशंटला देतात. वास्तविक कुठेही तपासणी करण्याचा पेशंटला हक्क आहे. मात्र इतर क्षेत्रापेक्षा वैद्यकीय क्षेत्रात कमिशनखोरी जोरात सुरू असल्याचे दिसून येते. कारण मेडिकलवाल्यांपासून ते डॉक्टर लॅब तसेच ॲम्बुलन्स यांच्यात आर्थिक साखळी आहे. या साखळीत सर्वसाधारण नागरिकांची पिळवणूक होत आहे. विविध प्रकारच्या नावाखाली रुग्णांची आर्थिक लूट केल्या जात आहे. डॉक्टरचे कमिशन द्यावे लागते, असे लॅबवाले सांगत आहे. त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांची आर्थिक पिळवणूक मोठ्याप्रमाणात होत आहे. पैसे कमावणे व तपासणीच्या नावाखाली अनेक लॅब टेक्निशियन रुग्णांच्या जीविताशी खेळत असल्याच्या स्पर्धा लागल्या आहेत. तरी शासनाने तसेच आरोग्य विभागाने यावर कारवाई करणे गरजेचे आहे, अशी नागरिकांकडून मागणी केली जात आहे.

# गुल्ली फळे वेचणाऱ्या महिलेवर अस्वलाचा हल्ला

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७चिखलदरा



मोहफूल वेचाईनंतर मेळघाटात आता त्याची फळे गुल्ली वेचण्याची आदिवासींमध्ये धडपड आहे. तालुक्यातील कन्हेरी येथे गुरुवार सकाळी ७.३० वाजता शेतात फळे वेचत असताना अस्वलाने अचानक हल्ला चढवून साठ वर्षीय आदिवासी महिलेला जखमी केले.आरडाओरड केल्याने बाजूच्या शेतातील शेतकरी धावले व ती वृध्दा बचावली. चुरणी ग्रामीण रुग्णालयात या महिलेवर उपचार सुरु आहेत.फुलकाय छोटेलाल कासदेकर (६०, रा. कन्हेरी असे जखमी महिलेचे नावआहे. गुरुवारी सकाळी ७.३० वाजता खंडू व नदीकाठी असलेल्या शेतात काम करत असताना अस्वलाने तिच्यावर हल्ला चढविताच घाबरलेल्या महिलेने आरडाओरड केली. यामुळे परिसरातील शेतात असलेले आदिवासी धावून आले व त्यांनी अस्वलास पिटाळून लावले. जखमी महिलेस चुरणी ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

मोहाच्या झाडाला मोहफुले संपल्यावर गुल्ली नामक फळ येते. या दिवसात ते फळ आदिवासी मोठ्याप्रमाणात जमा करतात. तेल काढून स्वयंपाकात त्याचा वापर आजही मेळघाटात होतो.मोहफूल अस्वलाचे आवडते खाद्य. ते खाण्यासाठी अस्वले येतात. यातून ही घटना घडली असावी.याप्रकरणी खा. बळवंत वानखडे यांनी महिलेला वनविभागाकडून तत्काळ मदत देण्याचे आदेश दिले.

# बकरी ईदनिमित्त अचलपूरमध्ये काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचा मुस्लिम बांधवांशी सद्भावाचा संवाद

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अचलपूर



बकरी ईदनिमित्त अचलपूर शहरातील ईदगाह चौक येथे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलूभाऊ देशमुख यांनी मुस्लिम बांधवांना प्रत्यक्ष भेटून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांनी मुस्लिम समाजासोबत ईद साजरी करत ऐक्य, बंधुता आणि शांततेचा संदेश दिला. उपस्थित नागरिकांशी संवाद साधत बबलूभाऊ देशमुख यांनी सर्वधर्मसमभावाचे महत्त्व अधोरेखित केले. ईदगाह परिसरात समाधानकारक वातावरणात पार पडलेला हा कार्यक्रम सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणारा ठरला.बबलूभाऊ देशमुख यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले की, सण-उत्सव हे समाजाला एकत्र आणण्याचे उत्तम माध्यम आहेत. बकरी ईद हा त्याग, समर्पण आणि एकोप्याचा संदेश देणारा सण आहे. या दिवशी आपण सर्वजण एकत्र येऊन प्रेम आणि सौहार्दाची भावना वाढवूया. त्यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देत, त्यांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

# जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धा आयोजित

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती



क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गतजिल्हा क्रीडा परिषद अमरावती तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती व सुब्रतो मुखर्जी स्पोर्टस् एज्युकेशन सोसायटी, नवी दिल्ली यांच्यावतीने २०२५-२६ या वर्षात आयोजीत करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय सुब्रतो फुटबॉल कप, सबज्युनिअर मुले, ज्युनिअर मुले/मुली क्रीडास्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.३ ते ५ जुलैदरम्यान विविध वयोगटाच्या स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंकरिता सबज्युनिअर १५ वर्षाआतील मुले क्रीडा स्पर्धेसाठी मुले वयोगटात १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा, तसेच ज्युनिअर १७मुले/मुली १ जानेवारी २००९ रोजीकिंवा त्यानंतर जन्मलेला असावा. जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप सबज्युनिअर क्रीडा स्पर्धेत सहभागी सर्व संघांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापूर्वीच सुब्रतो कप डॉट इन या संकेतस्थळावर खेळाडू आणि संघांनी नोंदणी करणे अनिवार्य आहे. सहभागी होणाऱ्या संघांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात ऑफलाईन नोंदणी २८ जूनपर्यंत करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जावर खेळाडूंचे संपूर्ण नाव, जन्मतारीख, वर्ग, आधार क्रमांक, शाळेचे नाव, पत्ता, शाळेचा युडायस क्रमांक, खेळाडू स्वाक्षरी, रजिस्टर नंबर, मोबाईल क्रमांक सस्था प्रमुख, मुख्याध्यापक यांचे स्वाक्षरीने पाठवावा. पंधरा वर्षाआतील खेळाडूंकरिता वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक आहे. खेळाडूंकडे जन्माचा दाखला,आधारकार्ड, खेळाडू ओळखपत्र, पासपोर्ट प्रतीत असणे आवश्यक आहे. सदर स्पर्धा १५ वर्षाआतील मुले व १७ वर्षाआतील मुले/मुली यांची स्पर्धा ३ ते ५ जुलै २०२५ रोजी घेण्यात येणार आहे.जिल्ह्यातील शाळा, संघांनी, सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑफलाईन नोंदणी करणे, तसेच अधिक माहितीकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती येथे संपर्क करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले आहे.

# बकरी ईद म्हणजेच 'ईद उल अज्हा' जिल्ह्याभरात उत्साहात साजरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ धा.रेल्वे/अमरावती**

मुस्लिम बांधवांसाठी पवित्र मानली जाणारी बकरी ईद (ईद-उल-अज्हा) शनिवारी अमरावती जिल्ह्यात उत्साहात, शांततेत साजरी करण्यात आली. पठाण चौक परिसरातील हेदरपुरा इदगाह येथे सकाळी ८.२५ वाजता ईद उल अज्हा ही सामुदायिक नमाज अदा करण्यात आली.

सकाळी ईदगाह मैदान येथे सामूदायिक नमाज पठण करण्यासाठी मुस्लिम समाज बांधव जमले होते. सामूदायिक नमाज पठण करून देशाच्या सुख-शांती व समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली. ईदच्या नमाजनंतर उपस्थित समाजबांधवांनी एकमेंकांची गळाभेट घेऊन शुभेच्छा दिल्या.यावेळी या परिसरात पोलिस बंदोबस्त हि लावण्यात आला होता.



बकरी ईद म्हणजेच 'ईद उल अज्हा' मुस्लिम समाजात इस्लामी कालगणनेच्या शेवटच्या 'जिलहिज्जा'च्या १० तारखेला त्याग व बलिदानाची शिकवण देणारा सण या सणानिमित्त धामणगाव रेल्वे शहरातील ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी मोठ्या भक्तिभावाने नमाज अदा करून सर्वांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.बकरी ईद हा मुस्लिम बांधवांचा महत्त्वाचा सण असल्याने या दिवशी बकऱ्याची कुर्बानी देण्याची प्रथा आहे. हजरत इब्राहिम अलैहीस्लाम व त्यांचे पुत्र हजरत इस्माईल अलैहीस्लाम यांच्या त्याग व बलिदानाच्या स्मृतीप्रीत्यर्थ बकरी ईद सण साजरा करण्यात येतो. आशा नूरानी मस्जिद चे इमाम हाफिज जाकिर यांनी प्रबोधन देताना सांगितला आहे .यावेळी मुस्लिम समाजातील बांधवांनी एकत्र येऊन धामणगाव शहरातील ईदगाह मैदानावर सकाळी साडेसात वाजता हाफिज इमरान यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक नमाज अदा केली. तर हाफिज इमरान यांनी मुस्लिम बांधवांसाठी धार्मिक प्रवचन दिले. नमाज अदा केल्यानंतर प्रार्थनाकरताना देशात शांतता राहावी, जातीय सलोखा अबाधित राहावा, यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. तसेच ईद शांततेत होण्यासाठी दत्तापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गिरीश ताठोड यांच्या नेतृत्वाखाली ईदगाह मैदान व शहरातील विविध भागात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# हॉर्न वाजवल्यानं सटकली एसटी बसमध्ये घुसून राडा

## ड्रायव्हर-कंडक्टरला चौघांची मारहाण यवतमाळ - अमरावती बस मध्ये राडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७यवतमाळ**




यवतमाळवरून अमरावतीकडे जाणाऱ्या एसटी बसमध्ये चार ते पाच तरुणांच्या टोळक्याने राडा घालून एसटी चालक आणि वाहकाला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. बसचालकाने टाटा मॅजिकला साईड देण्यासाठी हॉर्न वाजवला होता. मात्र, यावरून संतप्त झालेल्या टोळक्याने बसमध्ये चढून चालक-वाहकाला बेदम मारहाण केली. या प्रकरणात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटना वटफळी दोडकी हनुमान मंदिराजवळ, नेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. प्राथमिक माहितीनुसार, एसटी बसचालकाने टाटा मॅजिकला साईड देण्यास सांगण्यासाठी हॉर्न वाजवला. यावरून संतप्त झालेल्या तरुणांनी बसमध्ये घुसून राडा घातला.४ ते ५ जणांनी मिळून एसटी चालक आणि वाहकावर हल्ला चढवला.

या प्रकारामुळे बसमधील प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणानंतर नेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीनुसार, पोलिसांनी जग्गू मेश्राम, तेजस राठोड, हर्षल बनकर आणि शुभम जगताप या चौघांविरोधात गुन्हा दाखल केला. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, दरोडा टाकणे यासह गंभीर स्वरूपाचे कलम लावण्यात आले आहेत.

मारहाणीत वाहकाच्या हातातील १०,३६० रुपयांची रक्कमही कुणीतरी चोरून नेल्याचे समोर आले आहे. या घटनेची सखोल चौकशी सुरू असून, आरोपींचा शोध सुरू आहे. तसेच १०,३६० रूपये नेमकं कुणी लंपास केला, याचाही तपास सुरू आहे. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे.

# भूकंपानंतर प्रशासनाला जाग ! अमरावतीतील 'सिस्मोग्राफ' यंत्रणा सहा वर्षांपासून बंद; कशी होणार भूकंपाची नोंद?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

भूगर्भातील हालचालीचे नोंद घेणारे ऊर्ध्व वर्धा प्रकल्पावरील 'सिस्मोग्राफ' (भूकंपमापक) उपकरण सन २०१९ पासून बंद आहे. या यंत्राच्या खरेदीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने वेळोवेळी ऊर्ध्व वर्धा विभागाला पत्र देऊन पाठपुरावा करण्यात आला. शिवाय निधी उपलब्धतेची तयारीदेखील दाखविली आहे. तरीही सिंचन विभागाच्या वरिष्ठ कार्यालयाने दुर्लक्षित केल्याचे वास्तव आहे.

धारणी तालुक्यातील शिवझिरीसह या लगतच्या सुसर्दा, राणीगाव, डाबला, नारदू परिसरात ४ जून २०२५ रोजी रात्री ९:५८ वाजता ३.८ रिश्टर स्केलचा भूकंप झाल्याचे राष्ट्रीय भूकंपविज्ञान केंद्राने (एनसीएस) स्पष्ट केले. अशा परिस्थितीत जिल्ह्यातील सिस्मोग्रॉफ उफकरणावर नोंद का नाही? याविषयीची चर्चा सुरू झालेली आहे. त्यामुळे सहा वर्षांपासून बंद अवस्थेतील 'सिस्मोग्रॉफ' उफकरणाचा विषय ऐरणीवर आला.

यापूर्वी मेळघाटात अमझरी व टेटू केंद्रबिंदू असलेल्या गावांसह परिसरातील गावांमध्ये ३० सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १:३७ वाजता ४.२ रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता. त्यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे सीईओ अनिल भटकर यांनी ऊर्ध्व वर्धा विभागाचे कार्यकारी अभियंता यांना ४ ऑक्टोबर २०२४ रोजी पत्र देऊन सिस्मोग्रॉफ दुरुस्तीचे निर्देश दिले होते, हे येथे उल्लेखनीय.

**समितीचा अजीब तर्क**

ऊर्ध्व वर्धा विभागाद्वारा नव्याने सिस्मोग्राफ उपकरणाचा प्रस्ताव केंद्रीय रचना संस्था, (सीडीओ) नाशिक येथे पाठविला. हे उपकरण खरेदी करण्यासाठी एक समिती असते. यासाठी निधीदेखील भरणा केला. मात्र ऊर्ध्व वर्धा प्रकल्पावर नव्याने सिस्मोग्राफ बसविण्याची आवश्यकता नसल्याचे मत या समितीने व्यक्त केल्याची माहिती या विभागाने दिली.

कार्यकारी अभियंता, ऊर्ध्व वर्धा यांना प्रकल्पावरील सिस्मोग्राफ उपकरणाची दुरुस्ती करण्याचे पत्र यापूर्वी ४ ऑक्टोबर २०२४ रोजी दिलेले आहे. शिवाय आपत्ती व्यवस्थापनाच्या मान्सूनपूर्व बैठकीत या विभागाला निर्देश दिले आहे.

**- अनिल भटकर, आरडीसी तथा सीईओ जिल्हा आपत्ती व्यवस्थापन.**

# जिल्हा परिषद अमरावतीमध्ये शिव स्वराज्य दिन साजरा

## मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या हस्ते पुतळा पुजन व ध्वजारोहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**



शिव स्वराज्य दिनानिमित्त जि.प.अमरावती च्या प्रांगणात मा.मुख्य कार्यकारीअधिकारी संजीता महापात्र मॅडम(भाप्रसे) यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पुजन व हारार्पण करुन अभिवादन केले.व भगव्या स्वराज्यध्वजासह शिवशक राजदंड स्वराज्यगुढी उभारुन अभिवादन करण्यात आले.त्यानंतर राष्ट्रगीत व राज्यगीत गायन करण्यात आले. संजीता महापात्र मॅडम (भाप्रसे) यांनी सर्वांना शुभेच्छा देवून आपल्या मनोगत म्हणाल्या की,आज शिवराज्याभिषेक दिन हा प्रत्येक मराठी माणसासाठी गौरवाचा दिवस आहे,इतके वर्षापासुन महाराष्ट्र मध्ये काम करीत असतांना शिवाजी महाराजांबाबत त्यांचे गौरव ऐकत आहे त्यामुळे मला खुप अभिमान वाटते की,शिवाजी महाराजांच्या इतिहासाखाली काम करीत आहेअसे गौरवशाली उदगार केले.तसेच त्यांनी,आपण कुठलाही ऐतिहासिक क्षण साजरा करतो त्यामागे उद्देश काय असतो? की आपण आपला इतिहास विसरु नये. तसेच,शिवाजी महाराज यांनी स्वत:ला कधीही राजासारखे बघितले नसुन,प्रजेची सेवा करण्यासाठी ते तक्तवर बसले होते त्याचप्रमाणे आपण अधिकारी, कर्मचारी यांनी खुर्चीवर असतांना आपण एक पब्लिक सर्वन्टं म्हणुन बसायला पाहिजे ना की पब्लिक आँफीसर म्हणुन.प्रत्येकांनी सेवा करतांना पारदर्शकता,निरपेक्षकता सेवाभाव असायला पाहीजे,छत्रपती शिवाजी महाराजांचे ईतके वर्ष राज्य होते त्यामधुन खुप काही गोष्टी शिकण्यासारख्या आहेत,त्यामधील गोष्टीचे अनुकरण नक्की करावे,असे आवाहन करून प्रतिपादन केले. यावेळी प्रकल्प संचालक प्रितीताई देशमुख, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी हेमंत ठाकरे,उप मुकाअ (पावस्व) संजय खारकर,जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डाॅ.पुरुषोत्तम सोळंके,शिक्षणाधिकारी(माध्य) प्रियाताई देशमुख मॅडम, खाते प्रमुख जिप प्रामुख्याने सोहळयाला उपस्थित होते.यावेळी गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे यांचे नेतृत्वात जि.प.मुलींचे हायस्कुल अमरावती येथिल एनसीसी च्या विद्यार्थीनींनी प्रमुख अतिथी यांना बॅन्ड पथकाच्या गजरात परेड करुन मानवंदना दिले.या सोहळ्याला स्वीय सहाय्यक ज्ञानेश्वर घाटे,निलेश तालन, पंकज गुल्हाने,नितिन माहोरे,श्रीकांत मेश्राम,परमेश्वर राठोड,हेमंतकुमार यावले, विजय कविटकर,सुजीत गावंडे,सतिश पवार,अविनाश गावंडे,गजानन पाचपोर विशाल विघे,जीवन नारे,बाळकृष्ण आंधळे,दिनेश तांबडे,दिनेश राऊत,अर्चना मानकर,अर्पणा आत्राम,पंकज गोरले,रजनी मस्के,देवेंद्र दुबळे,आदित्य तायडे,निशांत तायडे,शरद चहाकार,मनिषा अंधारे, परिक्षित बाराहाते, गजानन जुनघरे,सचिन गायगोले इ.जिपचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.असे राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# अनुसूचित जमाती 'आयोग' पोहोचणार शेवटच्या माणसांपर्यंत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने ३ जून रोजी मंजुरी दिल्यानंतर हा 'आयोग' शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचावा, यासाठी राज्यभर प्रचार, प्रचार होणार आहे. या अनुषंगाने आदिवासी विकासमंत्री प्राचार्य डॉ. अशोक उईके यांनी पुढाकार घेतला असून, तसे पत्र भाजप प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना दिले आहे. १५ नोव्हेंबर २०२२ रोजी पालघर जिल्ह्यातील जव्हार येथे आयोजित बिरसा मुंडा जयंती कार्यक्रमात, तत्कालीन आमदार डॉ. संदीप धुर्वे यांनी ही मागणी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर, अनुसूचित जनजाती सल्लागार परिषदेत ११ ऑक्टोबर २०२३ रोजी पार पडलेल्या ५१व्या बैठकीत तसा ठरावही मंजूर झाला होता. 'ट्रायबल फोरम' ने पाच वर्षांपासून मागणी रेटून धरली होती.

**या २० जिल्ह्यांमध्ये होतील पत्रपरिषदा**


मुंबई, पालघर, नंदूरबार, नाशिक, धुळे, जळगाव, ठाणे, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, नांदेड, हिंगोली, अकोला, अहिल्यानगर, रायगड, जालना या २० जिल्ह्यांमध्ये पत्रपरिषदांमधून भूमिका मांडली जाणार आहे.

# बीटी कापसाच्या बियाण्यांच्या लेबल क्लेममध्ये संभ्रम: शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

कापूस उत्पादकांना २५ वर्षापासून संकरित बीटी कापसाचे प्रमाणित (सर्टिफाइड) बियाणे मागणी करूनही मिळत नसल्याने टुथफुल लेबल असलेली बियाणे वापरावे लागते. या बियाण्यांच्या पाकिटांवरील लेबल क्लेममध्ये नमूद केलेली जनुकांची टक्केवारी संभ्रमित करणारी आहे.

बियाणे कायदा १९६६ नुसार बियाण्यांच्या लेबल क्लेममध्ये बियाण्यांची भौतिक व आनुवंशिक शुद्धता, इतर बाबी, इतर पिकांचे व तण बियाणे, उगवण शक्ती, ओलावा आणि बीटी प्रथिने व त्यांचे प्रमाण आदी महत्त्वाच्या बाबी नमूद असतात. प्रत्येक कंपन्यांच्या पाकिटांवर बीटी जनुकांचे प्रमाण ९० ते ९५ टक्के असल्याचे नमूद आहे.



पाकिटांमधील बियाण्यांची संख्या किती, या बियाण्यांमधील बीटी जनुकांची टक्केवारी नेमकी कशी काढली, या जनुकांचे कापसाचे खोड, पाने, पात्या, फुले व सरकी यातील प्रमाण किती, बियाणे उगवल्यानंतर त्या झाडांमध्ये बीटी जनुके कार्यक्षम राहण्याचा काळ किती या मूलभूत बाबी कळायला मार्ग नाही. राज्य सरकारचा कृषी विभागदेखील या बाबी कधीच बारकाईने तपासून बघत नाही. या बाबी शेतकऱ्यांच्या फसवणुकीला कारणीभूत ठरू शकतात, अशी प्रतिक्रिया शेतकरी संघटना तंत्रज्ञान व कृषी विज्ञान विस्तार आघाडी प्रमुख मिलिंद दामले यांनी व्यक्त केली आहे.प्रत्येक कंपनी दुकानदारांकडून न विकलेले बियाणे दरवर्षी परत घेते. बियाणे उत्पादनाचा खर्च अधिक असल्याने ते बियाणे नष्ट करणे शक्य नाही. त्यामुळे पुढील वर्षी ते बियाणे नवीन पाकिटांमध्ये बाजारात येते.लेबल क्लेमवर बियाणे उत्पादनाचे वर्ष नमूद नसते. त्यामुळे ते बियाण्याचे उत्पादनाचे वर्ष व राज्य तसेच ते बियाणे एफ-१ आहे की एफ-२ आहे हे कुणालाही कळत नाही. एफ-१ च्या तुलनेत एफ-२ बियाण्यांची उत्पादकता कमी असते.

